**प्रेसनोट** **दि.३०/०५/२०१९**

**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**

**विद्यालयीन शिक्षण घेण्याया १८ पेक्षा कमी वयोगटातील मुलींना कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत महिला सुरक्षा व सेल्फ डिफेन्स याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**

सध्या समाजामध्ये मुली, महिला व बालके यांच्यावर होणाया अत्याचार, छळवणूक, गैरमार्गाचा अवलंब करणे याचे वाढते प्रमाण पाहत्या, लहान मुली, बालके यांना त्यांचे सुरक्षेबाबत व स्वतः चे सेल्फ डिफेन्सबाबत प्रशिक्षीत करणे आवश्यक असल्याने मुंढवा पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संपतराव डी. भोसले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक, शुभांगी नरके यांनी कम्युनिटी पोलीसींग अंतर्गत मुंढवा पोलीस ठाणे हद्दीतील १८ वर्ष वयोगटाखालील मुली व बालके यांचेकरीता चर्चासत्र/शिबीर आयोजीत करण्यात आले होते.

सदर शिबीर/चर्चासत्रामध्ये मुंढवा पोलीस ठाणे हद्दीतील ३५/४० मुली, महिला दक्षता समिती सदस्य यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संपतराव भोसले व महिला पोलीस उप निरीक्षक, शुभांगी नरके यांनी मुलींना सुरक्षेच्या अनुषंगाने पुणे पोलीस आयुक्तालयाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या बडीकॉप, पोलीस काका, सुरक्षा ॲप, दामिनी मार्शल, चाईल्ड हेल्पलाईन, मोबाईल सुरक्षा ॲप तसेच पोक्सो व इतर विविध कायद्यातील तरतुदी यांचे परिपुर्ण माहिती अवगत करण्यात आली. तसेच स्वतः व आपले शेजारी, परिसरामध्ये एखाद्यावर अन्याय, अत्याचार होत असल्यास त्याची माहिती तात्काळ स्थानिक पोलीसांना कशी द्यावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

वर नमूद पोलीस अधिकारी यांनी मुलींना उत्कृष्टरित्या मार्गदर्शन करुन समजावून सांगितल्याने महिला दक्षता कमिटी व मुलींची पालक यांनी पोलीसांचे आभार मानले व यापुढेही असेच मार्गदर्शन केलेस भविष्यामध्ये घडणाया अनैतिक घटनांना आळा बसले याबाबत मत व्यक्त केले.

**दि.३०/०५/२०१९**

**(संपतराव डी. भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**